स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कृषी विकासात कृषी आधारित उद्योगांची भूमिका : विशेष संदर्भ परभणी जिल्हा

(सन 2001-02 ते 2020-21)

पीएच.डी.(अर्थशास्त्र) पदवीच्या नोंदणीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

* संशोधक *

सुरनर चंद्रकांत नारायण

(एम.ए.बी.एड. अर्थशास्त्र)

मो. 9623965575 / 9518506762

E-mail: surnar2@gmail.com

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ.बोनर आर.वाय.

e-mail: renukadas.bonnar@gmail.com

मो. 8857879580 / 9284927168

संशोधन मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,

राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी

* संशोधन केंद्र *

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ संकुल, नांदेड

सप्टेंबर 2022

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

कृषी विकासात कृषी आधारित उद्योगांची भूमिका : विशेष संदर्भ परभणी जिल्हा

(सन 2001-02 ते 2020-21)

पीएच.डी.(अर्थशास्त्र) पदवीच्या नोंदणीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

* संशोधक *

सुरनर चंद्रकांत नारायण

(एम.ए.बी.एड. अर्थशास्त्र)

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ.बोनर आर.वाय.

संशोधन मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,

राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी

* संशोधन केंद्र *

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ संकुल, नांदेड

सप्टेंबर 2022

कृषी विकासात कृषी आधारित उद्योगांची भूमिका : विशेष संदर्भ परभणी जिल्हा (सन 2001-02 ते 2020-21)

प्रस्तावना:-

भारतीय जनतेच्या उदरनिर्वाहाचे सर्वात मोठे क्षेत्र म्हणजे कृषी क्षेत्र होय. अर्थशास्त्र विषयाच्या अनुषंगाने भारतीय शेती असा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा कृषी, वने, मत्स्य या तिघांचा अंतर्भाव भारतीय कृषी विषया अंतर्गत येतो. कृषी क्षेत्र हे भारतीय लोकांच्या नुसते उदरनिर्वाहाचे साधन नसून ते देशाच्या आर्थिक विकासाचे क्षेत्र आहे. भारताचा जीडीपी मधील वाटा 1950 51 मध्ये 55% इतका होता, तर तोच वाटा साधारणपणे 8.7% असल्याचे आढळून येतो.

तिसऱ्या योजना काळातील युद्धाने आणि दुष्काळाने जर्जर झालेल्या आपल्या भारत देशाला अमेरिकेतून निकृष्ट दर्जाचे धान्य आयात करावे लागले होते. त्यावेळी लालबहादूर शास्त्रीने तर आपल्याला एक वेळचे जेवण बंद करण्याचा संदेश दिला होता. म्हणजे त्यांचे असे म्हणणे होते की एक वेळेच्या जेवणाचा त्याग करा त्यावेळी लोकांनी जास्तीत जास्त कृषी सुधारणेकडे लक्ष दिले. आणि तेव्हापासून आजपर्यंत कृषी सोबत कृषी आधारित उद्योग निर्माण करण्यावर सर्वांनी भर दिला.

भारतात सर्वप्रथम कृषी आधारित उद्योग 1863साली करण्याचा विचार करण्यात आला होता. भारतातील सततच्या दुष्काळी परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी व दुष्काळाने ग्रासलेल्या ग्रामीण लोकसंख्येला उत्पन्नाचा आधार मिळावा म्हणून 1970 च्या दुष्काळ समितीने कृषीमाल आधारित उद्योगाची आवश्यकता प्रतिपादित केली. पुढे 1928 च्या रॉयल कमिशनने ब्रिटिश सरकारला याबाबत जागृत केले होते. कृषी आधारित उद्योगाच्या संबंधाने भारतात सर्वप्रथम 1883 चा विचार करण्यात आला की भारतातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करता व दुष्काळामुळे ग्रासलेल्या ग्रामीण लोकसंख्येला उत्पन्नाचा आधार मिळावा म्हणून 1970 च्या दुष्काळ समितीने कृषी आधारित

उद्योगाची आवश्यकता प्रतिपादित केली होती. पुढे 1928 च्या रॉयल कमिशन ने ब्रिटिश सरकारला याबाबत जागृत केले भारताचा विचार केला असता भारत हा जगातील प्रमुख फळे व भाजीपाला पिकवणारा उत्पादक देश आहे. त्यामुळे फळाच्या विपणनात काढणीनंतरची व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे असून त्यामध्ये मलाची प्रतवारी, पॅकिंग, फ्री कूलिंग, साठवण या प्रक्रिया वाहतूक व विक्री या व्यवस्थेचा समावेश होतो. काढणी पश्चात व्यवस्थापनातीलत्रुटीमुळेच आपल्या देशात दरवर्षी साधारणपणे एक लाख कोटीचे नुकसान होत आहे.

भारता प्रमाणेच कृषी आधारित उद्योग विकसित राष्ट्रांमध्ये 40% आहेत. शेतकऱ्यांनी बाजारपेठामध्ये कच्चामाल विक्रीसाठी नेण्यापेक्षा मालावर प्रक्रिया करून कृषी आधारित उद्योगा मार्फत चांगली किंमत (दर) मिळू शकतो. त्या दृष्टिकोनातून भारतातील कृषी आधारित उद्योगांना चालना देण्यात येत आहे. शेतीचे उत्पादन दुप्पट व्हावे आणि कामगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात मदत होईल; त्यातूनच शेतकऱ्यांना आशादायी दिलासा मिळेल.

महाराष्ट्रात असलेला सर्व शेतकरी वर्ग शेती आणि शेतीवर आधारित जे काही उद्योग व्यवसाय आहेत. त्याकडे कानाडोळा करत असल्याचे माझ्या निदर्शनास आले. आज आपल्या महाराष्ट्रात बाहेर राज्यातून कृषी आधारित पदार्थ, कच्चामाल, बियाणे, भाजीपाला, उत्पादित वस्तू हे सर्व विकत घ्यावे लागत आहे. या गोष्टीचा विचार करता आपल्या परभणी जिल्ह्यात असणाऱ्या कृषी आधारित क्षेत्राचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले. जिल्ह्यात असणाऱ्या कृषी आधारित उद्योगाची माहिती घेतली असता परभणी जिल्ह्यात कृषीवर आधारित काही व्यवस्था आहेत. त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी काय करावे लागेल; जसे की कृषी आधारित उद्योग, गोपालन, शेळीपालन, रोपवाटिका, डाळीच्या मिली, पापड गिरण्या, मसाले असे व्यवसाय निवडले तर आपल्या जिल्ह्यातील जनतेला रोजगार निर्माण होईल. तसेच आपल्या जिल्ह्यातून महाराष्ट्र शासनाला देखील फायदा होईल. या जिल्ह्यात जवळजवळ सर्वच तालुक्यातील शेतीही कृषी उद्योगासाठी कच्चामाल पुरविण्यासाठी योग्य आहे. या जिल्ह्यात कृषीवर आधारित असणाऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रावर आधारित असणारे उद्योग करण्यास कोणतीही अडचण किंवा समस्या निर्माण होणार नाही. परभणी जिल्ह्याचे क्षेत्रफळ पाहता 6511 चौरस

किलोमीटर आहे. यात शेती क्षेत्राचे प्रमाण जास्त असल्याचे निदर्शनास आले. शेती क्षेत्रावर आधारित व्यवसाय केल्यास परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर भौतिक सुविधा मिळतील. लोकांना जीवन जगण्यासाठी किंवा उदरनिर्वाहाची संधी निर्माण होईल. परभणी जिल्ह्याचा आर्थिक विकास होईल, तसेच परभणी जिल्ह्याचे नाव कृषी आधारित उद्योग क्षेत्रात घेतले जाईल.

सध्याच्या परिस्थितीत परभणी जिल्ह्यात असणाऱ्या कृषी आधारित उद्योग पाहिजे तेवढ्या प्रमाणात दिसून येत नाहीत. लोकांचा असणारा कल हा सेवा क्षेत्राकडे जास्त असल्याचे दिसून येते. त्यांचा कल कृषी आधारित उद्योगांकडे वळवण्यासाठी प्रथम या समस्येचा अभ्यास केला पाहिजे. त्यासाठी मी या समस्येची निवड केली आहे. कृषी आधारित उद्योग करीत असताना कोणत्या समस्या निर्माण होतात यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. जनतेला कृषी उद्योग क्षेत्रातून कशाप्रकारे जास्तीत जास्त फायदा होऊ शकतो हे समजण्यासाठी आणि शेतकऱ्यांना समजून घेण्यासाठी तयार असणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात लोकांच्या जवळजवळ 80 टक्के व्यवसाय शेती आहे या शेतकऱ्यांनी शेतीतून उत्पादित केलेल्या कच्च्या कच्च्या मालाचे पक्क्यामालात रूपांतर करून बाजारपेठेत नेण्यासाठी कृषी आधारित उद्योगांची गरज आहे. कारण कृषी आधारित उद्योगामुळे मिळणारा जास्तीचा पैसा हा त्यांच्या फायद्याचा ठरू शकतो, त्यांना कृषी आधारित उद्योगांसाठी शासनाकडून काही प्रमाणात अनुदानही मिळते याचा अभ्यास केला जाणार आहे.

परभणी जिल्ह्यात कृषीवर आधारित अनेक लघु, मध्यम आणि मोठे व्यवसाय आहेत. त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्यात असणाऱ्या समस्या शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यांच्या समस्येसाठी किंवा उनिवेसाठी कोणते उपाय करावे लागतील. याचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. कृषी आधारित उद्योगांना महाराष्ट्र शासनाकडून काही मदत मिळाली नसल्यास ती कशा पद्धतीने मिळते याचा देखील आढावा घेण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्याला किंवा कृषी उद्योग करणाऱ्या व्यक्तीला समुपदेशन पर मार्गदर्शन करणे व महाराष्ट्र शासनाकडून कृषी आधारित उद्योगासाठी असणाऱ्या योजनांची सविस्तर मांडणी करणे, अभ्यासासाठी घेतलेल्या या जिल्ह्यात असणाऱ्या नऊ तालुक्यातील कृषी आधारित व्यवसायांची तालुका निहाय

माहिती गोळा करणे. त्या त्या तालुक्यात कृषी आधारित व्यवसाय करण्यासाठी कच्चामाल वातावरण वाहतूक सुविधा कामगार यांचा अभ्यास करणे. उत्पादित झालेला माल विकण्यासाठी किंवा साठवून ठेवण्यासाठी योग्य त्या गोदामाची निवड करणे,याचा देखील अभ्यास येथे करण्यात येणार आहे.

आपल्या देशातील 70 टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या कृषी व्यवसायावर अवलंबून आहे. परंतु सध्या शेतीची झालेली दयनीय अवस्था पाहता यावर प्रामुख्याने उपाययोजना करणे गरजेचे झाले आहे. आज आपण बघतो की शेतकरी पिकवणारा आर्थिक संकटात सापडला आहे. उदा: 25 एकर कांदा बांधावर टाकून देत आहेत. याचा सर्वाधिक फटका महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांना बसला; यामुळे अशा परिस्थितीवर मात करण्यासाठी कृषी आधारित उद्योगांची नितांत गरज आहे.

व्याख्या:-

1) "कृषी आधारित उद्योग संस्था म्हणजे उत्पादनाचे विशिष्ट क्षेत्र ज्याचे भाग विविध ठिकाणी विखुरलेले असू शकतील; परंतु तिची मालकी व नियंत्रण एक व्यवसाय घटक म्हणून आवश्यकपणे एकत्र असेल." -प्रा. जॉर्ज बॉक.
2) "शेतीवर आधारित असणाऱ्या उद्योगाला कृषी आधारित उद्योग असे म्हणतात.''
3) "शेतीतून मिळणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करण्यासाठी शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या किंवा विकत घेतलेल्या यंत्रसामुग्रीच्या साह्याने कच्च्या मालाचे पक्क्यामालात रूपांतर करण्यासाठी जो व्यवसाय केला जातो, त्याला कृषी आधारित उद्योग असे म्हणतात.''
4) "उद्योग संस्था एक असे व्यावसायिक परिणाम असते जे जोखमीसाठी पुरेशी तरतूद करून नफा मिळवण्याच्या उद्दिष्टाने कार्यरत असते." -प्रा ऑस्कर लॉज.

मराठवाडा हा मागास प्रदेशातून याबाबत महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती प्रक्रियेपासून मराठवाडा विभागातील सर्वच जिल्हे मागास असल्याचे श्री पंडे समिती व श्रीवांचूसमिती 1969, यांनी दिलेल्या अहवालात दिसून आले. 1883

सालीचे दांडेकर समिती, 1991 ची श्री कुलकर्णी समिती, इंडिकेटर्स आणि बॅकलॉग समिती 1995, मागास प्रदेश दर्शविणारे समिती 1997 आणि विजय केळकर समिती 2011 या सर्व समित्यांनी वेळोवेळी दिलेल्या आपल्या अहवालात मराठवाड्याचे मागासले पण दिसून आले. त्यांनी विकासाच्या दृष्टीने वाटचाल करण्यासाठी शिफारसी केल्या; परंतु या सर्वांचा मनावा तसा फरक पडल्याचे दिसून आले नाही.

मराठवाडा विभागातील जिल्हा निहाय उद्योगांची स्थिती पाहता महाराष्ट्र उद्योग पाणी अहवाल 2010-11 नुसार औरंगाबाद- 777 उद्योग, नांदेड- 93, हिंगोली- 28, परभणी- 102, जालना- 128, लातूर- 75, उस्मानाबाद- 30 आणि बीड- 73 असे एकूण 1306 कृषी आधारित उद्योगांची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये केवळ औरंगाबाद जिल्ह्यात 70 एकर जमिनीवर मेगा फूड पार्क उभारणी करण्यात आली आहे. मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यांपैकी औरंगाबाद, नांदेड आणि जालना या तीन जिल्ह्यांचा औद्योगिक विकास तुलनेने अधिक आहे. कृषीमाल आधारित उद्योग विभागात सर्वाधिक ऊस, तेल, डाल, कापूस, मिरची पावडर, पापड हे उद्योग आपल्याला आढळून येतात. वेगवेगळया जिल्ह्यात वेगवेगळया कृषी आधारित उद्योगाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. या विभागात लातूर जिल्ह्यात डाळ प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना उत्पन्न मिळवून देणारा उद्योग ठरला आहे. त्यामुळे आज लातूरला महाराष्ट्रातील सर्वाधिक डाळ उत्पादक जिल्हा म्हणून किंवा डाळ निर्मिती प्रक्रिया करणारा जिल्हा म्हणून ओळखण्यात येतो. पण तसे पाहता परभणी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कापसा पासून बनवलेले सुती वस्त्रे तसेच ऊसाचे गाळप, कृषी आधारित लघु, मध्यम व मोठे उद्योग असल्याचे दिसून येत आहे. त्यापासून शेतकरी व शेतीवर आधारित उदरनिर्वाह भागवणारा मजूर वर्ग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. कृषी आधारित उद्योगामुळे मजूर वर्गांना मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल; व आर्थिक विकास होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पापड उद्योग, तेल गिरण्या, मसाल्याचे पदार्थ हे देखील पहावयास मिळतात. याचा सविस्तर अभ्यास आपण करणार आहोत.

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात शेतकरी उत्पादक कंपन्यांची स्थापना झाली आहे. या कृषी आधारित उद्योगामुळे शेतकऱ्यांना जास्त फायदा होऊ शकतो. विविध प्रक्रिया पदार्थ निर्मिती उद्योग उभारण्यासाठी शासनाने शेती आधारित किंवा कृषी आधारित उत्पादक कंपन्यांना आर्थिक पाठबळ देणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्राने कोरोनाच्या कठीण काळात दिलेला हात यंदा मात्र जरा आखडता घेतला आहे. तर निर्बंध हटल्यानंतर परत भरारी घेत उद्योग सेवा क्षेत्राने राज्याच्या प्रगतीला बस दिल्याचे चित्र 2021-22 च्या अभ्यासातून समोर येत आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचा आर्थिक वृद्धी दीडपटीने अधिक असून राज्यातील दरडोई उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यात राज्याचा आर्थिक वृद्धीदर देशाच्या तुलनेत अधिक राहण्याची परंपरा यावेळी जपली जात आहे.

परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी:-

परभणी जिल्ह्याची निर्मिती प्रक्रिया स्वातंत्र्यपूर्व काळात म्हणजेच 1853 साली झाल्याचे अनेक पुराव्यावरून समजते. 1 मे 1999 पूर्वी मराठवाडा विभागात एकूण सहा जिल्ह्यांचा समावेश होता. पैकी दक्षिणगंगा म्हणून म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरीच्या खोऱ्यातील मराठवाड्याचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून परभणी जिल्ह्याची ओळख आहे.1 मे 1999 रोजी जिल्ह्याचे विभाजन होऊन परभणी व हिंगोली असे दोन जिल्हे तयार झाले. पुढे 26 जून 1999 रोजी मानवत व सोनपेठ अशा दोन तालुक्याची निर्मिती झाली. सध्या परभणी जिल्ह्यात तालुक्यांची संख्या नऊ आहे.

1)परभणी

2)सेलू

3)जिंतूर

4)पाथरी

5)पूर्णा

6)पालम

7सोनपेठ

8)गंगाखेड

9) मानवत

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांपैकी ज्वारी पिकासाठी परभणी जिल्हा समृद्ध आहे. हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय भागात येतो. जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार 18.45° अक्षवृत्त ते 20.01° अक्षवृत्त व 76.13° रेखावृत्त ते 77.29° रेखावृत्त असा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा व हिंगोली, दक्षिणेस लातूर व बीड, पश्चिमेस जालना तर पूर्वेला नांदेड जिल्ह्याच्या सीमा लागून आहेत. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 6511 चौरस किलोमीटर असून 2011 च्या जनगणनेनुसार किल्ल्याची लोकसंख्या 18.35 लाख एवढी म्हणजेच राज्याच्या लोकसंख्येची हे प्रमाण 1.63% इतके आहे. परभणी जिल्ह्याची ओळख मराठवाड्यातील धान्याचे कोठार व मराठवाड्याचा कॅलिफोर्निया अशी करण्यात आली आहे. जिल्ह्याची नैसर्गिक परिस्थिती अनुकूल असून या जिल्ह्याच्या आर्थिक नाड्या शेती क्षेत्रावर व कृषी आधारित उद्योगधंद्यांवर अवलंबून आहे.

विषय अभ्यासाची आवश्यकता/गरज:-

वार्षिक उद्योग पाहणी अहवालानुसार (ASI) देशात कृषी आधारित उद्योगांची नोंदणी संख्या 37 हजार 175 इतकी आहे. त्यापैकी आंध्र प्रदेश 5735, तामिळनाडू 5161, तेलंगणा 3716, महाराष्ट्र 3077, पंजाब 2793 या पाच राज्यात कृषी आधारित उद्योगांची संख्या अधिक आहे.

महाराष्ट्र कृषी प्रधान राज्य असले तरीही या राज्यात परभणी जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून आले परभणी जिल्ह्यात मोठी लोकसंख्या बेरोजगारीचे जीवन जगत आहे. त्यामुळे कृषी आधारित उद्योगाचे अपुऱ्या संख्येमुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची व लघुउद्योजकांची हेळसांड होत आहे. त्या अनुषंगाने कारण मिमासा करण्याची आवश्यकता वाटली.

कृषिमाल आधारित उद्योगासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा असताना जिल्ह्यातील उद्योगांचा विकास का झाला नसावा यासाठी अभ्यास करण्यात येत

आहे. परभणी जिल्ह्यात अनुकूल वातावरण असताना देखील कृषी उद्योग का बंद पडत असावेत; याची कारणे शोधण्यासाठी हा विषय अभ्यासाला घेण्यात आलेला आहे. जिल्ह्यातील तालुका निहाय पीक रचना, शेती पद्धती, कृषी उत्पन्न बाजार समिती यांचा अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडण्यात आला आहे. कृषी आधारित उद्योगांचा अभ्यास करून याबाबत असणाऱ्या समस्या मांडल्या जाणार आहेत. ज्याद्वारे जिल्ह्यातील शेतकरी कृषी उत्पन्न बाजार समिती, लघु, मध्यम आणि मोठे कृषी आधारित उद्योग यांच्या समस्या सोडविण्यासाठी ही समस्या निवडलेली आहे. शासनाच्या ध्येयधोरणांचा अभ्यास करण्यासाठी तसेच निधी हस्तांतरण करताना या समस्येचा उपयोग कसा होतो; याचा अभ्यास करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी, या दृष्टीने जिल्ह्यातील उद्योग व रोजगारात बदल व्हावा, यासाठी आवश्यकता भासत होती. शेतकऱ्यांच्या कृषीमाल आधारित उद्योगामुळे उत्पन्न पातळी वाढ होण्यास मदत होऊन राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. या दृष्टिकोनातून संबंधित विषयाची निवड करण्यात आली आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे:-

1) परभणी जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांचा अभ्यास करणे
2) परभणी जिल्ह्यातील कृषी विकासात कृषी आधारित उद्योगांचे योगदान अभ्यासणे.
3) कृषी विकास व कृषी आधारित उद्योग यांच्यातील संबंध अभ्यासणे.
4) कृषी आधारित उद्योगांचा अभ्यास करून त्यांच्या समस्येवर उपाययोजना सुचवणे

अभ्यासाची गृहितके:-

1) कृषी आधारित उद्योगावर कृषी क्षेत्राचा विकास अवलंबून आहे.
2) कृषी आधारित उद्योगासाठी आवश्यक पायाभूत सुविधा अपुरे आहेत.
3) परभणी जिल्ह्यात कृषी आधारित उद्योगांची संख्या मर्यादित आहे.

4) कृषी विकास व कृषी आधारित उद्योग यांच्यात सहसंबंध आहे.

संशोधन पद्धती:-

प्राथमिक स्त्रोत:-

परभणी जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांचा यादृच्छिक पद्धती आणि पडताळा सूचीच्याद्वारे अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामध्ये संशोधनासाठी माहितीचे संकलन शेतकरी कामगार उद्योग व्यवसाय कर्मचारी यांच्याकडून निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली या तंत्रांच्या साह्याने माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

दुय्यम स्त्रोत:-

कृषी विकासात कृषी आधारित उद्योग विशेषतः संदर्भ परभणी जिल्हा याविषयी संशोधन करताना सन 2001-2 ते 2020-21 या वर्षाची उद्योग व्यवसायाची माहिती गोळा करून विश्लेषण करण्यात येणार आहे. तसेच ही माहिती गोळा करण्यासाठी मासिके, लोकराज्य, संशोधन पर बातम्या, निबंध, पी.एचडी प्रबंध, ग्रंथ, संदर्भ साहित्य इत्यादी दुय्यम साधना द्वारे माहिती गोळा करण्यात येणार आहे.

परभणी जिल्ह्यातील नऊ तालुक्यांची नमुना घटक म्हणून निवड करण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यात असणाऱ्या कृषी आधारित उद्योगांच्या व व्यवसायांच्या भेटी घेण्यात येणार आहेत. लघु, मध्यम व काही मोठ्या स्वरूपाचे उद्योग आहेत. त्यांच्या मुलाखती घेऊन कृषी आधारित उद्योगासंबंधीची आवश्यक माहिती घेऊन त्यांचे सांख्यिकीय तक्ते, आलेख, सरासरी, बहुलक इत्यादी साधनाद्वारे जमा झालेल्या माहितीवर प्रक्रिया करून अभ्यास कालावधीत त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

अभ्यास कालावधी:-

अभ्यासासाठी घेतलेले संशोधन सन 2001-2 ते 2020-21 या कालावधीसाठी करण्यात येणार असून संकलित माहितीचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रूपरेषा:-

प्रकरण पहिले- प्रस्तावना:-

या प्रकरणात आपण कृषी विकासासाठी कृषीवर आधारित असणाऱ्या उद्योगांची माहिती घेणार आहोत. त्यामध्ये भारतातील कृषीचा उगम, इतिहास, विकास, भारतीय शेतीमध्ये पिकवले जाणारे अन्नधान्य, कडधान्य, तृणधान्ये व गळीत धान्य यांचा व्यापार पेठेत असणारा भाव, भारतीय कृषी आधारित उत्पादित मालाची कृषी उद्योगात कोणत्या प्रकारे गुंतवणूक केली जाते; त्याची सविस्तर माहिती घेणार आहे. कृषी आधारित उद्योगांची कृषी विकासासाठीची गरज, महत्व या सर्व घटकांचा अभ्यास या प्रकरणात करणार आहोत. शोध प्रबंधासाठी निवडलेल्या विषयाच्या अभ्यासाचा संशोधन आराखडा या प्रकरणात मांडला आहे.

प्रकरण दुसरे- संदर्भ साहित्याचा आढावा:-

प्रस्तुत प्रकरणात आपण संशोधन विषयाची निगडित असणारे ग्रंथ,शोध प्रबंध,साप्ताहिक, मासिक,वृत्तपत्रे,दैनिके,संकेत स्थळे,लोकराज्य,कथा,कादंबऱ्या,ऐतिहासिक संशोधने इत्यादी साधनांच्या माध्यमातून संक्षिप्त आढावा घेणार आहोत.

प्रकरण तिसरे- परभणी जिल्ह्याची अर्थव्यवस्था:-

प्रस्तुत प्रकरणांमध्ये जिल्ह्यातील व्यापार,उद्योग संस्था,कृषी आधारित उद्योग,विपणन,बाजार समित्या,मूल्य,शिक्षण,संस्कृती,विनिमय यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे- परभणी जिल्ह्यातील कृषी व कृषी आधारित उद्योगांच्या समस्या:-

या प्रकरणांमध्ये आपण कृषी करण्यासाठी कोणकोणत्या समस्या निर्माण होतात याचा अभ्यास करणार आहोत. तसेच कृषीवर आधारित असणारे उद्योग त्यांच्या निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे- कृषी व कृषी आधारित उद्योगातील संबंध:-

प्रस्तुत प्रकरणात आपण शेती क्षेत्र आणि शेतीवर आधारित जे काही उद्योग असतील त्याचा अभ्यास करणार आहोत. त्यामध्ये व्यवसाय कामगार,सुविधा,अवजारे,साहित्य,रस्ता,हवा,पाणी,कच्चा माल,गोदामे,यंत्र इत्यादी सर्व गोष्टींचा कृषी आणि कृषी आधारित उद्योगांचा संबंध कसा आहे. हे स्पष्ट करणार आहोत.

प्रकरण सहावे- सारांश,निष्कर्ष व शिफारशी:-

सदरील प्रकरणात संशोधनासाठी निवडलेल्या विषयातून जे काही सत्यतेच्या आधारे निष्कर्ष निघतील त्याचा सारांश या प्रकरणांमध्ये स्पष्ट करण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील कृषी आधारित उद्योगांशी संबंधित असणाऱ्या घटकांचे समस्येचे व उपायोजनेचे जे निष्कर्ष निघतील ते सदरील प्रकरणात प्रस्तुत करण्यात येणार आहेत.

संदर्भ

1) किरण देसले व गीता देसले ‘स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग एक’ दीपस्तंभ प्रकाशन- जळगाव.
2) कोळंबे सर ‘स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र’ निराली प्रकाशन- पुणे.
3) डॉ देशमुख प्रभाकर ‘श्रमाचे अर्थशास्त्र’ विद्या प्रकाशन- नागपूर.
4) दत्त सुंदरम ‘इंडियन इकॉनोमी’ एस चांद अँड कंपनी- नवी दिल्ली.
5) देसाई जोशी ‘भारताचा आर्थिक विकास’ गो. ए. राणे प्रकाशन- पुणे.

6) नेरकर दिलीप ‘श्रम समस्या आणि संबंध’ श्री मंगेश प्रकाशन- नागपूर.

* मार्गदर्शक *

प्रा.डॉ. बोनर आर. वाय. संशोधन मार्गदर्शक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,
राणीसावरगाव ता. गंगाखेड जि. परभणी.

* संशोधक *

सुरनर चंद्रकांत नारायण
एम.बी.एड. अर्थशास्त्र